**ठळक बातम्या**

- शेतमाल आणि कापसाला वाजवी हमीभाव या मुद्द्यावर विधानसभेत प्रचंड गदारोळ

- राज्यात एकही शेतकरी लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही अशी कृषीमंत्र्यांची विधानपरिषदेत ग्वाही

- एक देश एक निवडणूक विषयक समितीला मुदतवाढ

- विमान उड्डाण रद्द झालेल्या प्रवाशांना इंडिगो कंपनी १० हजार रुपयांचं प्रवासाचं कुपन देणार

आणि

- गोवा नाइट क्लब आग प्रकरणी आरोपी लुथरा बंधूंना थायलंडमधे अटक, तर अजय गुप्ताला ७ दिवसांची पोलीस कोठडी

**<><><><><>**

विधानसभेत आज प्रश्नोत्तराच्या तासात नाफेड आणि सीसीआय मार्फत शेतमाल खरेदी संदर्भात सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. या खरेदी केंद्रांद्वारे सोयाबिन आणि कापसाला योग्य भाव मिळत नसल्याकडे सदस्य संतोष दानवे, विजय वडेट्टीवार यांनी सभागृहाचं लक्ष वेधलं. यावर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिलेल्या उत्तरानं समाधान न झाल्यानं विरोधकांनी गदारोळ केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यासंदर्भात बैठक घेऊन सरकारला निर्देश देण्याचं आश्वासन दिलं. मात्र तरीही विरोधकांचं समाधान न झाल्यानं विरोधकांनी सभात्याग केला.

दरम्यान, महाराष्ट्र लोक आयुक्त सुधारणा विधेयक २०२५ विधानसभेत आज संमत झालं. या विधेयकात तीन छोटे बदल करण्यात आले असून, यामध्ये नवीन भारतीय दंड संहितेचं नाव बदलून, भारतीय न्याय सुरक्षा संहिता असं करण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना शेततळी, अवजार खरेदी आणि इतर गरजांच्या मदतीसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही आणि एकही शेतकरी लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधानपरिषदेत दिली. गेल्या ४ वर्षांपासून विविध प्रकारच्या मदतीसाठी शेतकऱ्यांनी केलेले सुमारे ४८ लाख अर्ज कारवाईविना पडून असल्याबाबत रणजीतसिंग मोहिते पाटील, संजय खोडके, शशिकांत शिंदे आणि इतरांनी विचारलेल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते. कृषी समृद्धी योजनेसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

वर्धा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी अमली पदार्थांच्या तस्करीचं रॅकेट उघडकीला आलं, त्यासंदर्भात चौकशी सुरु असल्याचं गृह राज्य मंत्री पंकज भोयर यांनी आज विधानभवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. वर्धा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एक मेफेड्रॉनचा कारखाना उघडकीला आणून महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने १९२ कोटी रुपये किमतीचे १२८ किलो अमली पदार्थ जप्त केले होते. संबंधित कारखान्याला सील लावलं असून याप्रकरणी आपण स्थानिक पोलिसांच्या संपर्कात असल्याचं भोयर म्हणाले.

**<><><><><>**

लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासंदर्भातल्या संसदीय समितीचा कार्यकाळ लोकसभेनं आज वाढवला. पुढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत कार्यकाळ वाढवण्याचा प्रस्ताव समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी मांडला आणि लोकसभेनं तो आवाजी मतदानानं मंजूर केला.

भारतात ऊर्जेचा वापर वेगानं वाढत असून येत्या २० वर्षांत जागतिक पातळीवर ऊर्जेच्या वाढत्या मागणीत ३५ टक्के वाटा भारताचा असेल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेनं वर्तवला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली.

पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉलचं मिश्रण केल्यानं भारताचं कार्बन उत्सर्जन ७३६ लाख मेट्रिक टनांनी कमी झाल्याची माहिती रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत दिली.

***होल्ड... बाईट- नितीन गडकरी***

विकसित देश होण्यासाठी इंधन तेल आयात कमी करण्यची गरज असल्याचं मत गडकरी यांनी मांडलं.

**<><><><><>**

राज्यसभेत आज निवडणूक सुधारणांबाबत चर्चा सुरू आहे. काँग्रेस नेते अजय माकन यांनी चर्चेला सुरुवात केली. सर्व राजकीय पक्षांना समान संधी, पारदर्शकता आणि विश्वसनीयता या तीन कसोट्यांवर टिकणारी व्यवस्थाच जिवंत लोकशाही असते, मात्र या तिन्ही गोष्टींवर सध्या प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे, असा आरोप त्यांनी केला.

तत्पूर्वी, वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्तच्या चर्चेचा समारोप सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी केला. वंदे मातरम हा देशाचा आत्मा जागृत करण्याचा मंत्र आणि देशाच्या पुनर्निर्माणाचं आवाहन आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं. या चर्चेत ८० पेक्षा जास्त खासदारांनी भाग घेतला असून स्वातंत्र्यसंग्राम न पाहिलेल्या आजच्या तरुण पिढीला या चर्चेद्वारे याबाबत सखोल माहिती मिळेल आणि भविष्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दिवाळीचा समावेश युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत झाल्याबद्दल आज राज्यसभेच्या सदस्यांनी आनंद व्यक्त केला.

देशात डिजिटल पत्ता प्रणाली सुरू करण्यासाठी सरकार काम करत आहे, अशी माहिती सरकारनं आज राज्यसभेत दिली. या सर्वसमावेशक प्रणालीत कुणालाही आपला पत्ता घालता येईल आणि त्यात बदल करता येतील, अशी माहिती दूरसंचार राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी यांनी दिली.

जागतिक हवामान जोखीम निर्देशांकात भारताचा क्रमांक नववा असला, तरीही देशांतर्गत धोरण ठरवताना कोणत्याही बाहेरच्या निर्देशांकाचा विचार केला जात नाही, असं पर्यावरण राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी आज राज्यसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केलं.

**<><><><><>**

विमान उड्डाण रद्द झालेल्या प्रवाशांना इंडिगो कंपनी १० हजार रुपयांचे प्रवासाचे कूपन देणार आहे. या कुपनचा वापर वर्षभराच्या आत इंडिगोचे तिकीट आरक्षित करण्यासाठी करता येईल. ३ ते ५ डिसेंबरच्या दरम्यान उड्डाण रद्द झालेल्या,

विमानतळावर अडकून पडलेल्या प्रवाशांना ही कूपन दिली जातील, असं कंपनीनं पत्रक काढून स्पष्ट केलंय.

याशिवाय उड्डाणाला २४ तासापेक्षा कमी वेळ शिल्लक असताना उड्डाण रद्द झालेल्या विमान प्रवाशांना ५ ते १० हजार रुपयांची नुकसान भरपाई दिली जाणार आहे.

<><><><>

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेनं आपल्या प्रमुख व्याजदरात पाव टक्के कपात केली असून, २०२२नंतरचा हा नीचांकी स्तर आहे. व्याजदर पातळी साडेतीन ते पावणेचार टक्के पर्यंत राखण्याचं बँकेचं उद्दिष्ट आहे.

फेडरल रिझर्व्हनं सप्टेंबर महिन्यापासून सलग तिसऱ्यांदा व्याजदर कपात केली असून, या वर्षभरात एकंदर ७५ शतांश टक्के कपात झाली आहे. अमेरिकेतली वाढती महागाई आणि रोजगार निर्मितीतली मंदी, या पार्श्वभूमीवर बँकेनं हा निर्णय घेतल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

<><><><>

नाबार्ड, अर्थात राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेनं, ‘ग्रामीण आर्थिक परिस्थिती आणि भावना’ या विषयावर नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणात, ग्रामीण भागातल्या मागणीमध्ये सातत्यानं सुधारणा होत असल्याचं दिसून आलं आहे. यामधून गेल्या वर्षभरात ग्रामीण भागात कुटुंबांचं उत्पन्न आणि जीवनमान स्थिती सुधारत असल्याचे संकेत मिळत असल्याचं अर्थ मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात  म्हटलं आहे.

चालू वर्षात ग्रामीण भागातल्या ८० टक्के कुटुंबांची उपभोग्य वस्तूंची मागणी गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढली असून, मासिक उत्पन्नाच्या ६७ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम यावर खर्च होत आहे. तसंच ४२ पूर्णांक २ दशांश टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ असून, जीएसटी दरातल्या सुधारणांमुळे हे शक्य झाल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><>

गोवा नाइट क्लब आग प्रकरणातले आरोपी आणि क्लबचे भागीदार सौरभ लुथरा आणि गौरव लुथरा या दोघांना थायलंड पोलिसांनी आज ताब्यात घेतलं. गोव्यातल्या अरपोरा इथल्या क्लबमध्ये गेल्या शनिवारी आग लागून २५ जणांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर लुथरा बंधू थायलंडला पळून गेले होते. त्यांच्या विरोधात इंटरपोलनं ‘ब्लू कॉर्नर

नोटिस’ जारी केली होती. भारत सरकारच्या विनंतीवरून आज त्यांना फुकेत इथून ताब्यात घेण्यात आलं आणि त्यांना भारतात परत आणायची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

गोवा सरकारकडून मिळालेल्या प्रस्तावावरून या दोघांची पारपत्रं रद्द करण्याचा विचार सुरु असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं.

याप्रकरणी अजय गुप्ता या आरोपीला गोव्यातल्या न्यायालयानं ७ दिवसांची पोलीस कोठडी दिली.

**<><><><><>**

दहशतवादी कारवायांना पैसा पुरवठा प्रकरणी ठाणे जिल्ह्यात पडघा इथं सक्तवसुली संचालनालय आणि दहशतवाद विरोधी पथकानं आज सकाळी छापेमारी केली. यावेळी पडघा परिसरातल्या काही घरांमध्ये केलेल्या तपासात इलेक्ट्रॉनिक उपकरणं आणि बनावट कागदपत्र जप्त करण्यात आल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

**//<><><><><>//**